## कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ [म्हाडाचा घटक]

**कोंकण मंडळ सोडत -२०१८ मधील संकेत क्र.२७० शिरढोण व संकेत क्र.२७१ खोणी कल्याण या प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत, अत्यल्प उत्पन्न गटातील विजेत्यांना कोविड-१९ महामारीमुळे सदनिकेचा ताबा मिळण्यास झालेल्या विलंबाबाबत व सदनिका विक्री किंमतीचा शेवटचा हप्ता [१० टक्के] माफ करणेबाबत**

## जाहीर निवेदन

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की,कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ सोडत -२०१८ अंतर्गत संकेत क्र.२७० मौजे- शिरढोण व संकेत क्र.२७१ मौजे- खोणी कल्याण या प्रधानमंत्री अग्रिम अंशदान तत्वावरील आवास योजनेतील, अत्यल्प उत्पन्न गटातील(EWS) लाभार्थ्यांना कोविड-१९ महामारीमुळे सदनिकेचा ताबा मिळण्यास झालेल्या विलंबामुळे सदनिका विक्री किंमतीचा शेवटचा हप्ता [१० टक्के] माफ करण्यास ठराव क्र.२९६/२१ दि.२३.११.२०२२ अन्वये खालीलप्रमाणे मान्यता दिल्याचे निर्देश प्राप्त आहेत.

**१**]सोडत सन-२०१८ संकेत क्र.२७० शिरढोण व संकेत क्र.२७१ खोणी ता.कल्याण जि.ठाणे या सोडतीतील ज्या अर्जदारांनी दि.०६.१०.२०२२ पुर्वी म्हाडाकडे सदनिकेच्या विक्री किंमतीच्या १००% रक्कमेचा भरणा केलेला आहे व ज्यांना अद्याप सदनिकेचा ताबा दिलेला नाही अशा अर्जदारांना शिरढोणकरीता शेवटचा हप्ता [१० %] रक्कम रु.१,४३,०९०/- व खोणीकरीता शेवटचा हप्ता [१० %] रक्कम रु.१,६३,१०८/- चा परतावा करण्यास मान्यता देणेत येत आहे.

२] सोडत सन-२०१८ संकेत क्र.२७० शिरढोण व संकेत क्र.२७१ खोणी ता.कल्याण जि.ठाणे या सोडतीतील ज्या अर्जदारांनी दि.०६.१०.२०२२ पुर्वी म्हाडाकडे सदनिकेच्या विक्री किंमतीच्या १०% ते ९० % पर्यंत रक्कमेचा भरणा केलेला आहे व ज्यांना अद्याप सदनिकेचा ताबा दिलेला नाही, अशा अर्जदारांना शिरढोणकरीता शेवटचा हप्ता [१० %] रक्कम रु.१,४३,०९०/- व खोणीकरीता शेवटचा हप्ता [१० %] रक्कम रु.१,६३,१०८/-एवढी रक्कम, **जर संबधित विजेत्यांनी एकूण विक्री किंमतीच्या ९०% रक्कमेचा भरणा दिनांक ३१.०१.२०२३ पूर्वी केल्यास शेवटचा हप्ता [१० %] माफ करणेस मान्यता देणेत येत आहे.तथापि दिनांक ३१.०१.२०२३ नंतर उर्वरित रक्कमेचा भरणा करणा-या लाभार्थ्यांना शेवटचा हप्ता [१० %] रक्कम माफीचा लाभ मिळणार नाही व अर्जदारास संपूर्ण [१०० %]रक्कमेचा भरणा करावा लागेल.**

३] २०१८ च्या सोडतीतील संकेत क्र.२७०, शिरढोण व संकेत क्र.२७१, खोणी मधील ज्या अर्जदारांना तात्पुरते देकारपत्र देऊनसुध्दा दि.०६.१०.२०२२ पर्यंत विक्री किंमतीपोटी काहीही रक्कम मंडळाकडे भरणा केलेली नाही अशा अर्जदारांना शेवटचा हप्ता [१० %] माफ न करता त्या अर्जदारांचे अर्ज रद्द करून प्रतिक्षा यादीतील अथवा नवीन जाहिरातीद्वारे अर्ज मागविण्यासाठी मान्यता देणेत येते. कृपया याची नोंद घ्यावी.

सदर निवेदन कोंकण मंडळ सोडत -२०१८ मधील संकेत क्र.२७० शिरढोण व संकेत क्र.२७१ खोणी कल्याण या प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत, अत्यल्प उत्पन्न गटातील विजेत्यांसाठी लागु राहील.

**(एम.आर.मोरे)**
**मुख्य अधिकारी,**
**कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**मुंबई**